# शिक्षण विभाग महानगरपालिका,नाशिक

राजीव गांधी भवन, शरणपूर रोड नाशिक -४२२००२

Email:-nmcschoolboard@gmail.com, फोन क्र :- ०२५३-२५७१२८९


जा.क्र./आस्था/शि.वि./कार्या-१/२१३३ दिनांक ०६/०८/२०२६

## जाहीर सूचना

**विषय:- नाशिक महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शिष्वृती संच पुस्तकांच्या खरेदीसाठी दरपत्रके (Quotation) मागविणेबाबत.**

नाशिक महानगरपालिका, नाशिक शिक्षण विभागामार्फत महानगरपालिका प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी व शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करण्याच्या उद्देशाने खालील नमूद केलेल्या पुस्तकांची खरेदी करण्यात येणार आहे.

याकरिता इच्छुक प्रकाशक / अधिकृत वितरक / पुस्तक विक्रेते यांच्याकडून खालील नमूद पुस्तकांसाठी प्रति पुस्तक अंतिम दर (GST सह) सीलबंद दरपत्रकाद्वारे मागविण्यात येत आहेत.

**मागविण्यात येणाऱ्या पुस्तकांचा तपशील**

| अ.क्र. | इयत्ता / परीक्षा | माध्यम | पुस्तकाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | इयत्ता 4 | मराठी | PRATH. SHISHYA IV – I BHASA / GANIT |
| 2 | इयत्ता 4 | मराठी | PRATH. SHISHYA IV – II ENG. / BUDDHI |
| 3 | इयत्ता 7 | मराठी | UCCHA. PRATH. SHISHYA VII – I BHASA / GANIT |
| 4 | इयत्ता 7 | मराठी | UCCHA. PRATH. SHISHYA VII – II ENG. / BUDDHI |
| 5 | इयत्ता 4 | सेमी इंग्रजी | PRATHMIK SHISHYA IV – I BHASA / MATH |
| 6 | इयत्ता 4 | सेमी इंग्रजी | PRATHMIK SHISHYA IV – II ENG. / BUDDHI |
| 7 | इयत्ता 7 | सेमी इंग्रजी | UCCHA. PRATH. SHISHYA VII – I BHASA / MATH |
| 8 | इयत्ता 7 | सेमी इंग्रजी | UCCHA. PRATH. SHISHYA VII – II ENG. / BUDDHI |

### आवश्यक कागदपत्रे

- ✓ **जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration).**
- ✓ **PAN कार्डची प्रत.**
- ✓ **संबंधित प्रकाशकाचे अधिकृत वितरक असल्याचे प्राधिकरण पत्र (लागू असल्यास).**
- ✓ **फर्म नोंदणी प्रमाणपत्र.**
- ✓ **स्वाक्षरी व शिक्क्यासह दरपत्रक.**

### -अटी व शर्ती-

1. सर्व दर प्रति पुस्तक नमूद करावेत.
2. दरपत्रक फर्मच्या अधिकृत लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यासह सादर करणे आवश्यक राहील.
3. पुस्तकांचा पुरवठा नवीनतम (Latest Edition) आवृत्तीचा असावा.
4. आवश्यकतेनुसार पुस्तकांच्या संख्येमध्ये वाढ अथवा घट करण्याचा अधिकार शिक्षण विभागास राहील.
5. कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचा अंतिम निर्णय नाशिक महानगरपालिका शिक्षण विभागाचा राहील व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**दरपत्रक सादर करण्याबाबत इच्छुक प्रकाशक / अधिकृत वितरक / पुस्तक विक्रेत्यांनी आपले सीलबंद दरपत्रक आवश्यक कागदपत्रांसह शिक्षण विभाग, नाशिक महानगरपालिका येथे 7 दिवसांच्या आत सादर करावे.**

**प्रशासन अधिकारी**
**शिक्षण विभाग**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**